# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 - 1@.

---

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 07/04/2020.

आदेश

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी करोना विषाणुमुळे (COVID-19) संदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे अनुषंगाने उस्मानाबाद जिल्हयात दि. 14.04.2020 पर्यंत Lockdown केलेले आहे. त्यामुळे जिल्हयातील नागरिक हे त्यांच्या अडचणी व सूचनांसंदर्भात जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधत आहेत. त्यांच्या विविध विभागाशी सबंधित अडचणी तातडीने सोडविणे आवश्यक आहे तसेच त्यांच्या सूचनांवर देखील प्राधान्याने विचार होणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद जिल्हयातील नागरीकांच्या अडचणी तातडीने सोडविण्यासंदर्भात व त्यांच्या सूचनांवर त्वरीत कार्यवाही करण्याकरीता जिल्हास्तरावर खालीलप्राणे पथक गठीत करीत आहे.

| अ. क्र. | अधिका-याचे नाव व पदनाम | ठिकाण/ कार्यक्षेत्र | पार पाडावयाच्या जबाबदा-या |
|---|---|---|---|
| 1. | श्री. कोंडेकर, जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, जि.का. उस्मानाबाद पथक प्रमुख मो.नं.9890748855<br>सहाय्यक<br>1. श्री. पुरुषोत्तम रुक्मे, सहा. जिल्हा | उस्मानाबाद जिल्हा | 1. करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी विविध उपाययेजनांच्या अनुषंगाने लोकांकडून/जनतेकडून व्हाट्सप (Whatsapp) |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | सुचना व विज्ञान अधिकारी, जि. का. उस्मानाबाद मो.नं.9970814856<br>2. श्री. पंकज पाटील, C.M.Fellow<br>मो.नं.9404421427 | | वर प्राप्त अडचणी व सुचना संदर्भात मेसेज/संदेशाची नोंद करणे.<br>2. प्राप्त मेसेज/संदेश त्या त्या वेळी सबंधित विभागांकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविणे तसेच सबंधितास केलेल्या कार्यवाहीबाबत अवगत करणे.<br>3. सबंधित विभागाकडून केलेल्या कार्यवाहीबाबत आढावा घेणे तसेच अर्जदार यांना सबंधित विभागाने कळविण्याबाबत खात्री करणे.<br>4. उक्त केलेल्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकारी यांना अनुपालन सादर करावे. |

सदर चे आदेश आज दिनांक 07.04.2020 रोजी सही शिक्क्यानिशी दिले आहेत.

(दिपा मुधोळ-मुंडे)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
उस्मानाबाद

प्रत:- 1. मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
4. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
5. उपविभागीय दंडाधिकारी तथा INSIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.
6. तालुका दंडाधिकारी तथा INSIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.
7. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

7/4/20
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
उस्मानाबाद

Scanned by CamScanner

# प्रेसनोट

आपण सर्वच जाणता की, करोना व्हायरस चे आगमन भारतात झाले आहे. त्यासाठी सर्वच स्तरातून प्रतिबंधात्मक उपाययोजना भारत सरकार राबवत आहे. आपल्या उस्मानाबाद जिल्ह्यात या रोगाचा प्रसार होऊ नये म्हणून आपण खबरदारी घेणे आवश्यक आहे. करोना विषाणुमुळे (COVID-19) संदर्भात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे अनुषंगाने उस्मानाबाद जिल्हयात दि. 14.04.2020 पर्यंत Lockdown केलेले आहे. त्यामुळे जिल्हयातील नागरिक हे त्यांच्या अडचणी व सूचनांसंदर्भात जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधत आहेत. त्यांच्या विविध विभागाशी सबंधित अडचणी तातडीने सोडविणे आवश्यक असून उस्मानाबाद जिल्हयातील नागरीकांच्या अडचणी तातडीने सोडविण्यासंदर्भात व त्यांच्या सूचनांवर त्वरीत कार्यवाही करण्याकरीता जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे व्हाट्सप (Whatsapp) नंबर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

1. मो.नं.9890748855
2. मो.नं.9970814856
3. मो.नं.9404421427

जिल्हाधिकारी या नात्याने मी आवाहन करते की, करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या अनुषंगाने आपल्या कांही अडचणी व सुचना असल्यास वरील व्हाट्सप क्रमांकावर मेसज/संदेश पाठविण्यात यावेत.

(दिप्रा मुधोळ-मुंडे)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
उस्मानाबाद

Scanned by CamScanner